फौजदारी किरकोळ अर्ज क्र.११९७/२०२२
MHDH030059432022

## निशाणी क्र.१ खालील अंतिम आदेश

१. अर्जदार अजहर जाविद कुरेशी यांनी प्रस्तुतचा अर्जदार त्यांचे मालकीची होंडा कंपनीची युनिकॉर्न मोटारसायकल नोंदणी क्र. एमएच–१८–बी.क्यु.–५५८७, चेसीज क्रमांक ME4KC315GKA086621 व इंजीन क्र. KC31EA1086678 हा मुद्देमाल ताब्यात मिळण्यासाठी दाखल केला आहे.

अर्जातील कथन थोडक्यात खालील प्रमाणे –

२. अर्जदाराचे म्हणण्यानुसार ते दिनांक २८/०९/२०२२ रोजी दुपारी ०२.४५ वाजेच्या सुमारास धुळे शहरातील दाता सरकार येथे दर्गासमोर त्यांची मोटारसायकल हँडल लॉक दर्शनासाठी गेले होते. परंतु परत आल्यावर त्यांना त्यांची मोटारसायकल मिळुन आली नाही. त्यामुळे अर्जदाराने दिनांक २९/०९/२०२२ रोजी धुळे शहर पोलीस स्टेशन येथे गुरनं. ५७६/२०२२ भा.द.वि. कलम ३७९ प्रमाणे फिर्याद दिली. पोलीसांनी सदर गुन्हयात सदरची मोटारसायकल जप्त केलेली असुन सदरची मोटारसायकल त्यांच्या अर्जदाराची मालकीची आहे. अर्जदार हा मजुरी करीत असल्याकारणाने सदर मोटारसायकल दैनंदिन कामासाठी आवश्यक आहे. अर्जदाराने पुढे असेही कथन केले आहे की, सदर मोटारसायकल धुळे शहर पोलीस ठाणे, धुळे येथे पडून राहिल्यास सदर वाहनाचे उन, वारा व पावसामुळे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. सदरचे वाहन त्यांना ताब्यात मिळाले नाही तर अर्जदाराचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार असुन अर्जदारावर उपासमारीची वेळ येईल. सदर वाहन त्याचे ताब्यात दिल्यास तो न्यायालयाच्या हुकूमाप्रमाणे सर्व अटी–शर्तींचे पालन करील, खटल्याचा निकाल लागेपावेतो सदर वाहनाचे स्वरुपात बदल करणार नाही, तसेच तो न्यायालयाच्या हुकूमाप्रमाणे योग्य त्या रकमेचा बंधपत्र देण्यास तयार आहे.

३. सदरच्या अर्जावर सरकारी वकीलांनी आक्षेप घेतला की, प्रस्तुत अर्जातील मागणी केलेले वाहनासंदर्भात अर्जदाराच्या मालकी हक्काबाबत पुरेसे दस्तऐवज दाखल केलेले नाहीत. गु.र.क्र. ५७६/२०२२ चा तपास अद्याप बाकी आहे. सदरचा मुद्देमाल अर्जदारास परत केल्यास तो वाहनाच्या मुळ स्वरुपात बदल होण्याची अथवा विक्री होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब अर्जदाराचा अर्ज रद्द करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली.

४. तपासी अधिकारी, धुळे शहर पोलीस स्टशेन यांनी नि.४ वर त्यांचे म्हणणे दाखल केले की, जप्त मुद्देमाल अर्जदारास योग्य त्या अटी व शर्तीवर अर्जदारास परत करण्यास हरकत नसल्याचा खुलासा दिला आहे.

५. अर्जाच्या पृष्ठयर्थ अर्जदाराने फिर्यादीची छायांकित प्रत, अर्जदाराचे आधारकार्डाची सत्यापित प्रत, वाहनाचे आर.सी. बुकची सत्यापित प्रत, विमा प्रमाणपत्राची छायांकित प्रत निशाणी क्र. ०३ च्या दस्त यादी सोबत दाखल केलेली आहे.

६. दोन्ही बाजूच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. सदर प्रकरणातील कागदपत्राचे अवलोकनार्थ असे दिसून येते की, सदर गुन्हयातील मुद्देमाल – मोटारसायकल ही अर्जदाराच्या मालकीची आहे. सदर वाहन धुळे शहर पोलीस स्टेशन, धुळे येथे उघडयावर पडून राहिल्यास उन, धुळ व पाउस यामूळे सदर वाहनाचे स्पेअरपार्ट व मशिन खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याशिवाय, अर्जदारा व्यतिरिक्त सदर मुद्देमालाची कोणीही मागणी केली नाही. या सर्व बाबींचा सारासार विचार करता, गुन्हयातील जप्त मुद्देमाल मोटारसायकल ही काही अटी व शर्तीच्या सुपूर्दनाम्यावर अर्जदाराचे ताब्यात देणे मला वावगे वाटत नाही, म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. जप्त वाहन होंडा  कंपनीची युनिकॉर्न मोटारसायकल नोंदणी क्र. एमएच–१८–बी.क्यु.–५५८७, चेसीज क्रमांक  ME4KC315GKA086621 व इंजीन क्र. KC31EA1086678 ही रक्कम रु.१,००,०००/– (अक्षरी रक्कम रु. एक लाख मात्र) चे बंधपत्र लिहून घेवून खालील अटी व शर्तीनुसार अर्जदार अजहर जाविद कुरेशी यांच्या ताब्यात द्यावी.

अ. अर्जदाराने सदर वाहनामध्ये कोणतेही बदल, त्याचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण तसेच, विकी करु नये अथवा इतर कोणत्याही प्रकारे विल्हेवाट लावू नये.

ब. अर्जदाराने सदर वाहनाचे दोन रंगीत छायाचित्र काढून या न्यायालयात दाखल करावे.

क. न्यायालय आदेश देईल त्या – त्या वेळी अर्जदाराने सदरचे वाहन न्यायालया समक्ष हजर करावे.

ड. सदर वाहनाबाबत न्यायालयाने दिलेल्या प्रत्येक आदेशाचे अर्जदाराने काटेकोरपणे पालन करावे.

३. वरील अटी व शर्तींचा अर्जदाराकडून भंग झाल्यास त्याचे बंधपत्र जप्त करण्यात येईल व त्याचेकडून बंधपत्रातील रक्कम वसूल करण्यात येईल.

४. सदर गुन्हयाचा तपास अधिका–यांना आदेश देण्यात येतो की, त्यांनी सदर वाहनाचा सविस्तर पंचनामा तयार करुन तो दोषोराप पत्रा सोबत दाखल करावा.

५. सदर आदेशाची प्रत मुळ खटल्या सोबत ठेवावी.

Digitally signed by SHWETA VINAY CHANDAK
Date: 2022.12.21 17:30:30 +0530

(डॉ. श्वेता वि. चांडक )

दिनांक  २१.१२.२०२२

२रे  सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
धुळे.

– <u>प्रमाणपत्र</u> –

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द–न–शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :– | एस.एस.माळी |
| न्यायालयाचे नांव | :– | २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धुळे |
| पी.डी.एफ.संचिका अपलोड केल्याचा दिनांक | :– | २१.१२.२०२२. |

सही/–
लघुलेखक (ग्रेड–३)